नियमित फौ. ख. क्र. ५१/२०२३
सरकार -वि.- बबन व इतर
नि.क्र. ३३.

## सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - प्रफुल विश्वनाथ माहुरे,
वय ४६ वर्षे, व्यवसाय – पो.ह. ब.क्र. १२०१,
राहणार – पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत** -

१. मी आरोपींना ओळखतो. ते आज कोर्टात हजर आहेत. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक १७.०६.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गुन्हा क्रमांक २४८/२०२३ नोंद झाला होता. त्याचा तपास माझ्याकडे आला. तपासा दरम्यान मी घटनास्थळी गेलो. त्याठिकाणी उपस्थीत असलेल्या दोन व्यक्तीना पंच म्हणून हजर राहण्याकरीता समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येते. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३५** देण्यात येते. त्यानंतर आरोपींनी ज्या काठीने मारले होते ती आरोपींकडून जप्त करुन तसा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३६** देण्यात येते. त्यानंतर जखमीच्या वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत वैद्यकीय अधिका-याकडे क्युरीकरीता पत्र दिले होते. आता मला दाखविलेलेपत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येते. साक्षीदारांचे बयान

नोंदविले. मी साक्षीदार वसंता दादाजी काकडे याचे बयान घेतले होते. आता मला आर्टिकल अ वरील त्याचे बयान वाचून दाखविण्यात आले. ते त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आले होते. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येते. मी साक्षीदार मधू रुपचंद गणविर याचे बयान घेतले होते. आता मला आर्टिकल अ वरील त्याचे बयान वाचून दाखविण्यात आले. ते त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आले होते. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येते. तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले. जप्त केलेल्या काठ्या मला दाखविल्या तर मी त्या ओळखू शकतो. आता मला दाखविलेले आर्टिकल 'अ' वरील काठ्या त्याच आहे.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मला तपासात निष्पन्न झाले होते की, फिर्यादीच्या मुलीचे लग्न आरोपी क्र.२ सोबत झाले होते व ती त्याच्या सोबत राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ सोबत फिर्यादीच्या मुलीचे लग्न फिर्यादी व त्याच्या पत्नीला मान्य नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादी व त्याची पत्नी त्यांच्या मुलीला आरोपी क्र.२ कडून आणण्याकरिता प्रयत्न करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची मुलगी त्यांच्याकडे यायला तयार नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे फिर्यादीला व त्याच्या पत्नीला आरोपी विरोधात द्वेष निर्माण झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादीने खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने त्याच्या मुलीला आरोपीच्या घरुन आणले होते. हे मला माहीत नाही की, फिर्यादीच्या मुलीचे दुसरे लग्न झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ जाऊन पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी

फिर्यादीची पत्नी व त्याच्या मुलीचे बयान घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तपास केलेली घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांसमक्ष काठ्या जप्त केल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ व ब वरील काठ्या वेळवाच्या नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३६ वरील जप्ती पंचनाम्यामध्ये वेळवाच्या काठ्या जप्त केल्या असे नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी क्युरी करीता पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तपासादरम्यान मला वेळवाची तीसरी काठी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, वसंता दादाजी काकडे व मधू रुपचंद गणविर यांचे बयान घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी सोबत संगनमत करुन खोटा तपास करुन खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०४.११.२०२५.

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.